**लवाद दावा क्र. ५१/२०२६ मधील निशाण ५ वरील आदेश**
**ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिंगार वि. श्री महादेव अश्रु उर्फ आसरु थोरात व इतर**

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी ४ यांनी मौजे जिल्हा तुकडी अ. नगर पैकी मौजे भिंगार येथील शहापुर केतकी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.२९५/१ पैकी क्षेत्र १ हे.३६ आर पैकी ० हे. २ आर व त्यावरील ग्रामपंचायत मिळकत नं. ४२० बांधकामासह ही तारण गहाण ठेवलेली मिळकत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो कोणासही परस्पर विक्री करु नये तसेच तारण, गहाण व दान अथवा बक्षिस या मार्गाने हस्तांतरित करु नये अथवा त्यावर कोणाचाही कोणताही हक्क किंवा त्रयस्त इसमाचा बोजा निर्माण करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी १ यांनी वादी संस्थेकडे घरदुरुस्तीसाठी कर्ज मागणीचा अर्ज केला असता वादी संस्थेने प्रतिवादी १ यांना रक्कम रु ६,००,०००/- चे कर्ज मंजुर केले. सदर कर्जास प्रतिवादी यांनी मौजे भिंगार येथील शहापुर केतकी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.२९५/१ पैकी क्षेत्र १ हे.३६ आर पैकी ० हे. २ आर व त्यावरील ग्रामपंचायत मिळकत नं. ४२० बांधकामासह रजीस्टर गहाणखत दि. ११/१०/२०२१ रोजी दस्त नं ३१२५/२०२५ अन्वये रक्कम रुपये ६,००,०००/- करिता तारण दिली. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी हे सदर तारण मिळकत हस्तांतरित करण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास वादी संस्थेचे कधीही कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याने अर्ज मंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

३. प्रतिवादी २ ते ४ यांनी सदर अर्जास नि. २१ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी संस्थेने प्रतिवादी २ यांचे ४ कोरे चेक कर्जास हमी/तारण घेतले होते. वादी संस्थेने सदरचे चेक प्रतिवादी यांना परत दिले नाही.

प्रतिवादी १ यांना रक्कम रु ६,००,०००/– चे कर्ज मंजुर केल्यानंतर रक्कम रु ५,१२,०००/– प्रतिवादी १ यास मिळाले. उर्वरित रक्कम रु ८८,०००/– प्रतिवादीस मिळाले नाही. वादी संस्थेने केलेली व्याजाची आकारणी बेकायदेशीर केली आहे. जिल्हा निबंधक अ. नगर तसेच तालुका निबंधक अ. नगर यांनी सदर तक्रारींची पडताळणी करुन सहकार कायदा कलम १०१ खाली दावा फेटाळला आहे. या कारणांवरुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

४. प्रतिवादी १ यांनी सदर अर्जास नि. २४ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी संस्थेने प्रतिवादी १ यास रक्कम रु ५,१२,०००/– दिले व उर्वरित रक्कम रु ८८,०००/– प्रतिवादीस मिळाली नाही. वादी संस्थेने कलम १०१ खालील दाव्याच्या निकालाविरुध्द कोठेही अपील केलेले दिसुन येत नाही. तसेच वादी संस्थेने कर्ज रकमेवर केलेले व्याज आकारणी ही बेकायदेशीर केली आहे. या कारणांवरुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

५. वादी व प्रतिवादीच्या कथनानुसार खालील मुद्दे काढण्यात आले. त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसासह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे तुर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्यास हक्कदार आहेत काय ? | होय |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा दावा व अर्जाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी १ ते ४ यांचे विरुद्ध कर्ज रकमेचे व्याजासह वसुली होण्याकरिता दाखल केला आहे. वादी संस्थेच्या कथनानुसार प्रतिवादी १ यांना वादी संस्थेने रक्कम रु ६,००,०००/– चे कर्ज दि. १०/११/२०२१ रोजी अदा केले. सदर

कर्जास प्रतिवादी १ यांनी मौजे भिंगार येथील शहापुर केतकी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.२९५/१ पैकी क्षेत्र १ हे.३६ आर पैकी ० हे. २ आर व त्यावरील ग्रामपंचायत मिळकत नं. ४२० बांधकामासह रजीस्टर गहाणखत दि. ११/१०/२०२१ रोजी दस्त नं ३१२५/२०२५ नुसार रक्कम रु ६,००,०००/– करिता तारण दिली.

७. प्रतिवादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद करतेवेळी या न्यायालयासमोर नमुद केले की, वादी संस्थेने प्रतिवादीविरुध्द सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अ. नगर यांचेकडे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणेबाबत प्रकरण दाखल केले होते. सदरचा दावा गुंतागुंतीचा आर्थिक दावा असल्याचे निदर्शनास आल्याने योग्य त्या न्यायालयात मागणेकामी निकाली काढण्यात आला आहे. दाव्याचे अवलोकन करता सदरची बाब ही वादीने प्रस्तुत दाव्याच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये देखिल नमुद केली आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी संस्थेने कलम १०१ खाली वसुलीसाठीचा दावा क्र. १०९/२५ चे दाव्याच्या निकालाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली नाही. प्रस्तुत दाव्यात वादी संस्थेने नि. ४/१५ वर सहाय्यक निबंधक यांनी दि. २१/०१/२०२६ रोजी दिलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर पत्राचे अवलोकन करता सदर पत्रान्वये सहाय्यक निबंधक यांनी वादी संस्थेचे चेअरमन यांना वादी संस्थेने प्रतिवादी विरुध्द कलम १०१ अन्वये वसुली दाखल्याकामी दाखल केलेले प्रकरण हे आर्थिक गुंतागुंत असल्याने १०१ चा दाखला देणे न्यायोचीत ठरणार नसल्याने वसुली दाखल्यासाठी योग्य त्या न्यायालयात दाद मागावी असे कळविले आहे. यावरुन कलम १०१ खाली वादी संस्थेने प्रतिवादीविरुध्द वसुली दाखला प्राप्त केल्याचे दिसत नाही तर सदरचे प्रकरण हे वादी संस्थेने प्रतिवादीविरुध्द या न्यायालयात योग्य ती दाद मागण्यासाठी दाखल केल्याचे दिसून येते.

८. वादीने सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ नि. ४/११ वर वादी संस्थेस कर्जास तारण दिलेले गहाण खत दाखल केले आहे. सदर गहाण खताचे अवलोकन करता प्रतिवादी १

यांनी गहाणखत लिहुन देणार म्हणून व प्रतिवादी ४ यांनी मान्यता देणार म्हणून उपरोक्त नमुद मिळकत गहाण ठेवल्याची दिसुन येते. वादीच्या कथनानुसार सदर मिळकत ही प्रतिवादी ४ हे हस्तांतरित करण्याची दाट शक्यता आहे. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी स्थावर मिळकत इतरांची नावे हस्तांतरित केल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी नि. २६/१ वर जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग–१ सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचेकडील दि. २०/०७/२०२६ रोजीचे पत्र दाखल केले. सदर पत्राचे अवलोकन करता सदरील पत्र हे जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग–१ सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी अप्पर विशेष लेखापरीक्षक वर्ग २, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांना प्रतिवादी यांनी वादी संस्थेविरुध्द दिलेल्या तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याविषयी कळविल्याचे दिसून येते.

९. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुद्ध कर्ज रकमेची वसुली होणेकरिता दाखल केला आहे. अशा परिस्थितीत, दाव्यांची विविधता टाळण्यासाठी, या टप्प्यावर वादीला प्रतिवादी ४ यांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबत अंतरिम दिलासा देणे न्यायोचित ठरेल. अन्यथा, दावा दाखल करण्याचा उद्देशच निष्फळ ठरेल. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर वरीलप्रमाणे देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

१०. वर चर्चा केल्यावरुन वादीस सकृत दर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. त्यामुळे मुद्दे क्र.१ करीता मी वरीलप्रमाणे उत्तर देवून, मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी ४ यांनी मौजे भिंगार येथील शहापुर केतकी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.२९५/१ पैकी क्षेत्र १ हे.३६ आर पैकी ० हे. २ आर ही मिळकत प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो कोणासही परस्पर विक्री करू नये. तसेच तारण, गहाण व दान अथवा बक्षीस या मार्गाने हस्तांतरित करू नये अथवा त्यावर कोणताही हक्क किंवा बोजा निर्माण करू नये.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही

दिनांक २३/०७/२०२६

(म. प्र. जसवंत)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय अहमदनगर.